सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
(Formerly University of Pune)

**समन्वय कक्ष (माध्यम)**
**गणेशखिंड, पुणे**

**Media Co-ordination Cell**
Ganeshkhind, Pune-7

१६ ऑक्टोबर २०१९

# विद्यापीठात कोरियन भाषा अभ्यासक्रमाचे उद्घाटन

पुणे-
भारतीय मुलांपर्यंत कोरियन भाषेचे सखोल ज्ञान आणि कौशल्य पोहोचवण्याच्या उद्देशाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय केंद्र आणि दक्षिण कोरियातील इंटरनॅशनल माईंड एज्युकेशन इन्स्टिट्यूट यांच्या वतीने विद्यापीठात कोरियन भाषा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. त्याचे उद्घाटन कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या उपस्थितीत नुकतेच पार पडले.

या वेळी इंटरनॅशनल माईंड एज्युकेशन इन्स्टिट्यूटचे संचालक श्री. मीनू सू, प्र-कुलगुरु डॉ. एन. एस. उमराणी व आंतरराष्ट्रीय केंद्राचे संचालक डॉ. विजय खरे हे उपस्थित होते. हा अभ्यासक्रम आठ आठवड्यांचा आहे. त्यातून कोरियन भाषा व संस्कृतीची ओळख होईल. त्यामुळे विद्यार्थ्यांना नोकरी-रोजगार मिळण्यास मदत होईल. इंटरनॅशनल माईंड एज्युकेशन इन्स्टिट्यूट ही कोरियातील महत्वाची संस्था आहे. त्यांच्यामार्फत मानसिक प्रशिक्षण, विविध शैक्षणिक कार्यक्रम चालवले जातात. ही संस्था आणि विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय केंद्र यांच्यात या संदर्भात जून महिन्यात सामंजस्य करार झाला होता. त्यानंतर आता हा अभ्यासक्रम सुरू झाला आहे. त्याला विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे, अशी माहिती डॉ. खरे यांनी दिली.

---

**अभिजित घोरपडे**
विशेष कार्याधिकारी, माध्यम समन्वय कक्ष
sppumediacell@gmail.com